राज्यातील ग्रामीण घरकुल योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी व संनियंत्रण करण्यासाठी 'राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना' ची व्याप्ती वाढवून राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण"कक्षात रूपांतरीत करण्याबाबत

# महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग
## शासन निर्णय क्रमांकः इंआयो-२०१५/प्र.क्र.४१३/योजना-१०

२५, मर्झबान रोड, बांधकाम भवन,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
दिनांक : १० फेब्रुवारी,२०१६

वाचा - **शासन निर्णय क्रमांकः ग्राम विकास विभाग क्र. इंआयो-२०१५/प्र.क्र.२४०/योजना-१०,दि.१६ जुलै, २०१५**

**प्रस्तावना -**

राज्य शासनाने ग्रामीण गृहनिर्माणला विशेष महत्व दिले आहे. दरवर्षी राज्यात इंदिरा आवास योजने अंतर्गत रु.१००० कोटीच्या वर निधी खर्च करण्यात येतो. तसेच दरवर्षी साधारणत: एक लाखाच्यावर घरकुले बांधण्यात येतात.

सन २०१३-१४ पर्यंत केंद्र शासनाकडून मिळणारा निधी थेट जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांना उपलब्ध करुन दिला जात होता. तथापि, केंद्र शासनाच्या निर्देशानुसार सन २०१४-१५ पासून सदरचा निधी राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा केला जातो व अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांना वितरीत करण्याची कार्यवाही मंत्रालय स्तरावरून करावी लागते. त्यामुळे केंद्रीय निधी अर्थसंकल्पित करणे व वितरीत करण्यासाठी समन्वय करणे, वित्त विभागाकडून BDS वर रक्कमा काढून वितरीत करणे इत्यादी अतिरिक्त कामे मंत्रालय स्तरावर ग्राम विकास विभागाकडे आलेली आहेत.

अलिकडेच केंद्र शासनाने सन २०२२ पर्यंत "सर्वांसाठी घर" हे धोरण जाहिर केले आहे. त्यानुसार, संपूर्ण भारतात नागरी क्षेत्राकरिता दोन कोटी घरे व ग्रामीण भागाकरिता चार कोटी घरे या कालावधीत बांधून द्यावयाची आहेत. महाराष्ट्र राज्य हे क्षेत्र आणि लोकसंख्या या दृष्टीकोनातून मोठे राज्य असल्यामुळे येत्या काही वर्षात राज्याला घर बांधण्यासाठी मोठया प्रमाणात अतिरिक्त उद्दीष्ट दिले जाण्याची शक्यता आहे.

सन २०१५-१६ पासून केंद्र शासनाने इंदिरा आवास योजने अंतर्गत EFMS-PFMS प्रणाली अंमलात आणण्याचे निर्देश दिले आहेत. इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा किंवा गट विकास अधिकारी यांच्यामार्फत निधी उपलब्ध करून देण्याची पूर्वीची कार्यपध्दती आता अस्तित्वात राहणार नसून त्याऐवजी योजनेच्या लाभार्थ्यांना निधी थेट उपलब्ध होणार आहे.

राज्य स्तरावर ग्राम विकास विभागांतर्गत कोणतेही संचालनालय किंवा आयुक्तालय नसल्यामुळे अन्य मंत्रालयीन विभाग तसेच ३४ जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व अन्य क्षेत्रीय कार्यालये

यांच्याशी यासंदर्भात समन्वय ठेवणे अशा स्वरूपाची कामे मंत्रालय स्तरावरुन केली जातात. सद्य:स्थितीत या व्यापक कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मंत्रालय स्तरावर धोरण निश्चित करणे, योजनेचे समन्वय व संनियंत्रण करणे यासाठीची व्यवस्था अपुरी पडत आहे.

इंदिरा आवास योजनेसंदर्भात ३४ जिल्हयांशी समन्वय साधण्यासाठी व प्रभावीपणे संनियंत्रण करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्थापन कक्ष असल्यास ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमाची वेगाने व प्रभावीपणे अंमलबजावणी करता येऊ शकेल. यास्तव स्वतंत्र -राज्य व्यवस्थापन कक्ष - इंदिरा आवास योजना संदर्भाधीन शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आला आहे.

राज्यात इंदिरा आवास योजना या केंद्र पुरस्कृत योजने व्यतिरिक्त सामाजिक न्याय विभागाची रमाई आवास योजना, आदिवासी विकास विभागाची शबरी आवास योजना व गृहनिर्माण विभागाच्या राजीव गांधी निवारा योजना ह्या राज्य पुरस्कृत घरकुल योजना या विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणामार्फत राबविल्या जातात. या राज्य योजनांच्या समन्वयासाठी राज्यस्तरावर स्वतंत्र यंत्रणा निर्माण केल्यास या योजनांची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करणे शक्य होईल.

सर्व बाबी लक्षात घेता व ग्रामीण घरकुलांशी निगडीत सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी सर्वसमावेशक समन्वयन कक्ष स्थापन करण्याची आवश्यकता होती. यासाठी स्थापन झालेल्या - राज्य व्यवस्थापन कक्ष - इंदिरा आवास योजनाची व्याप्ती वाढवून - राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण सुरू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय -

उपरोक्त पार्श्वभूमीवर शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे - .

राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी व संनियंत्रण करण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना कक्षाचे रुपांतर राज्य व्यवस्थापन कक्ष -ग्रामीण गृहनिर्माण कक्षामध्ये करण्यात येत आहे. या कक्षाद्वारे ग्रामविकास व जलसंधारण विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, व राज्य शासनाच्या इतर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण भागातील सर्व गृहनिर्माण कार्यक्रमाची अंमलबजावणी व संनियंत्रण करण्यात येईल. राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना साठी निश्चित केलेली रचना व उपलब्ध असलेली नियमित पदे राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण साठी वापरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण साठी परिशिष्ट अ मध्ये दर्शविलेली प्रतिनियुक्ती /कंत्राटी पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर पदांवर होणारा खर्च राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माणसाठी प्रशासकीय खर्चाकरिता उपलब्ध होणाऱ्या निधीतून भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर पदांची कर्तव्ये व जबाबदा-या परिशिष्ट-ब मध्ये दर्शविल्याप्रमाणे असतील. याशिवाय जादा पदे मंजूर करण्याबाबत वेळोवेळी कामाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तर सचिव समितीची मान्यता घेण्यात यावी.

राज्य व्यवस्थापन कक्ष -ग्रामीण गृहनिर्माण या कार्यालयाचा प्रशासकीय खर्च केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या इंदिरा आवास योजनेंतर्गतच्या ४% प्रशासकीय खर्चाच्या निधीमधील राज्यस्तरावर राखून ठेवण्यात येणाऱ्या ०.५% निधीमधून भागविण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. तसेच उर्वरित ३.५% निधी मधून क्षेत्रिय स्तरावरील प्रशासकीय खर्च भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

राज्यातील सर्व प्रशासकीय विभागाद्वारे (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग इत्यादी) राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण गृहनिर्माण योजना यापुढे राज्य व्यवस्थापन कक्ष -ग्रामीण गृहनिर्माण कक्षामार्फत राबविण्यात येणार आहेत. त्यामुळे या योजनांच्या नियतव्ययाच्या २% एवढा निधी संबंधित प्रशासकीय विभागाकडून विभागस्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर व ग्रामपंचायत स्तरावरील प्रशासकीय खर्चाकरिता उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

राज्य व्यवस्थापन कक्ष -ग्रामीण गृहनिर्माण अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा आढावा व अंमलबजावणीसाठी कामकाज आढावा समिती व कार्यकारी समितीस परिशिष्ट-क मध्ये दर्शविल्याप्रमाणे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

केंद्र शासनाने ग्रामीण गृहनिर्माण निधी व्यवस्थापनासाठी CSR, हुडको व इतर वित्तीय संस्थांकडून पतपुरवठा व कर्ज उपलब्ध करुन घेणे यासाठी रजिस्टर्ड सोसायटी स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. आवश्यकतेनुसार अशी रजिस्टर्ड सोसायटी निर्माण करण्याचे अधिकार कार्यकारी समितीकडे सोपविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील इंदिरा आवास योजनेप्रमाणे राज्य शासनाच्या विविध ग्रामीण घरकूल योजनांचा निधी PFMS प्रणालीव्दारे थेट लाभार्थ्यांच्या बँक/पोस्ट खात्यात उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२१०१३२५०८७२२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

V Giriraj

Digitally signed by V Giriraj
DN: c=IN, o=All India Service, ou=Principal Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=V Giriraj
Date: 2016.02.17 17:00:31 +05'30'

( वि.गिरीराज)

**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव

३. मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे स्वीय सहायक
४. मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे स्वीय सहायक
५. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव
६. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव /सचिव, नियोजन/वित्त/सामाजिक न्याय/ आदिवासी विकास/ गृहनिर्माण विभाग
७. महालेखापाल, (लेखा परिक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई (पाच प्रतींसह)
८. महालेखापाल, (लेखा परिक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर (पाच प्रतींसह)
९. सर्व विभागीय आयुक्त
१०.आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर
११.सर्व जिल्हाधिकारी
१२.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
१३.सर्व उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय
१४.संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना, सिडको भवन (दक्षिण कक्ष), सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.
१५.सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
१६.जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
१७.उप कोषागार अधिकारी, बेलापूर, नवी मुंबई.
१८. वित्त विभाग (व्यय-१५) व ( अर्थ-१७) मंत्रालय मुंबई-३२.
१९.नियोजन विभाग (१४८१/१४४४), मंत्रालय, मुंबई-३२
२०.अप्पर संचालक, प्रकल्प आखणी व एकात्मीक ग्रामीण विकास कार्यक्रम कक्ष,
२१.कार्यासन अधिकारी, वित्त-७, वित्त-१, योजना-१, योजना-२, योजना-५ व योजना-७, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
२२.निवड नस्ती.

## परिशिष्ट-अ

## राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण करिता निर्माण करण्यात आलेल्या पदांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या

**राज्य समन्वयक (MIS)**

- ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमाचे संपूर्ण संनियंत्रण राज्य स्तरावरून करणे
- ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमाचा वेळोवेळी आढावा घेऊन कार्यक्रमाची एकत्रित माहिती, तुलनात्मक तक्ता, ग्राफ्स, चार्टसव्दारे राज्य व केंद्र शासनास पाठविणे
- ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमाची अंमलबजावणीसाठी आर्थिक व भौतिक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नियोजन करणे
- ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा, तालुका व ग्राम स्तरापर्यंत मार्गदर्शन करणे
- AwaasSoftवPFMS प्रणालीव्दारे कार्यक्रमाच्या आर्थिक व भौतिक प्रगतीचे संनियंत्रण करणे.

**लेखा सहायक**

- राज्य शासकनाकडील निधी जिल्हा, तालुका व लाभार्थ्यांना PFMS प्रणालीमार्फत वितरीत करणे
- निधीचे व्यवस्थापन
- उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त करून घेणे
- वितरीत निधीचे लेखा परीक्षण
- महालेखापाल कार्यालयाकडील लेखा परीक्षा, स्थानिक निधीचे लेखापरीक्षण इ. ची आक्षेपासंदर्भात कार्यवाही करणे
- जिल्हयांकडून उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त करून पुढील हप्ता (निधी) प्राप्त करून घेण्याची कार्यवाही करणे

**कार्यकारी अभियंता**

- जिल्हा व तालुका पातळीवर तांत्रिक मार्गदर्शन करणे
- कुशल कारागिरांचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे
- नावीन्यपूर्ण बांधकाम व Low cost technology चा वापर करणे
- ग्रामीण गृहनिर्माणाअंतर्गत चांगल्या प्रतीची / दर्जाची बांधकामे करण्यासाठी उद्युक्त करणे
- चांगल्या दर्जाच्या घराच्या बांधकामासाठी लाभार्थी, गट विकास अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा आणि इतरांना तांत्रिक सहाय्य करणे.

**कनिष्ठ अभियंता**

- स्थानिक संसाधनाचा वापर करून घरकुलांचे बांधकाम करण्यासाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी समन्वय करणे.
- महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत घरकुल लाभार्थ्यांना देय असलेले ९० दिवसांचे अकुलश मनुष्य दिन मिळण्यासाठी संनियंत्रण करणे
- स्वच्छ भारत अभियानांतर्गत शौचालय बांधकामचे संनियंत्रण करणे

**डाटा एंन्ट्री ऑपरेटर/लिपीक**

- आवास सॉफ्ट व PFMS प्रणालीसंदर्भातील डाटा एंन्ट्रीची कामे
- लिपीक वर्गीय कामे

**वास्तुरचनाकार/ सल्लागार**

- घरकुल बांधकामाचे नावीन्यपूर्ण आराखडे तयार करणे
- घरकुल बांधकामासाठी उपलब्ध नैसर्गिक साधनसामुग्रीचा वापर करणे
- वास्तुरचनेबद्दल भूकंप प्रतिरोधक, अग्निरोधक घरांच्या विविध प्रकारचे आराखडे तयार करणे

**बँक तज्ञ**

- PFMS प्रणाली राबवितांना बँकींग क्षेत्राशी संबंधित सहकार्य घेणे
- Bank, Hudco, LIC व वित्तीय संस्थांकडून ग्रामीण गृहनिर्माणासाठी अर्थसहायाव्यतिरिक्त अतिरिक्त निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करणे
- ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्राची अंमलबजावणी राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर बँक व वित्तीय संस्था, राज्य शासन यामध्ये समन्वय ठेवणे
- बँकींग क्षेत्रातील कुशल व तज्ञ व्यक्तींचा सहभाग वाढविणे

**शिपाई**

- शिपाई वर्गासाठी नेमून दिलेले काम

## परिशिष्ट-ब

### राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माणकरिता निर्माण करावयाची पदे

| अ.क्र. | पदाचे नांव | पदभरती स्त्रोत | अंदाजित वेतन/मानधन | पद भरतीचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | राज्य समन्वयक (MIS) | कंत्राटी/ बाह्य यंत्रणा | रू.२२०००-२५००० | खुल्या बाजारातून |
| २ | लेखा सहायक | कंत्राटी/ बाह्य यंत्रणा | रू.१५०००-२०००० | खुल्या बाजारातून |
| ३ | कार्यकारी अभियंता | प्रतिनियुक्ती / कंत्राटी | रू.१५६००-३९१०० ग्रेड पे रू.६६००/- किंवा रू.४०,०००-५०,००० | प्रतिनियुक्ती / खुल्या बाजारातून |
| ४ | कनिष्ठ अभियंता | जिल्हा परिषदमधून प्रतिनियुक्तीने/ बाह्य यंत्रणा | रू.९३००-३४८०० ग्रेड पे रू.४३०० किंवा रू.२५०००-३५००० | प्रतिनियुक्तीने/ बाह्य यंत्रणा |
| ५ | डाटा एंन्ट्री ऑपरेटर / लिपीक -२ | कंत्राटी/ बाह्य यंत्रणा | रू.१५,०००-२०,००० | खुल्या बाजारातून |
| ६ | वास्तुरचनाकार / सल्लागार | कंत्राटी/बाह्य यंत्रणा | रू.४०,०००-५०,००० | खुल्या बाजारातून |
| ७ | बॅकिंग तज्ञ | कंत्राटी/ बाह्य यंत्रणा | रू.५०,०००-६०,००० | खुल्या बाजारातून |
| ८ | शिपाई -२ | बाह्य यंत्रणा | रू.८०००-१२,००० | खुल्या बाजारातून |

## परिशिष्ट-क

"राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण" हा कक्ष खालील दोन समित्यांच्या मार्गदर्शनानुसार व निदेशानुसार कार्ये पार पाडील.

### (अ) कामकाज आढावा समिती (Performance Review Committee)

| | |
|---|---|
| १) मा.मंत्री, ग्राम विकास | अध्यक्ष |
| २) मा.मंत्री, गृहनिर्माण | सदस्य |
| ३) मा.मंत्री, सामाजिक न्याय | सदस्य |
| ४) मा.मंत्री, आदिवासी विकास | सदस्य |
| ५) मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता | सदस्य |
| ६) मा.राज्यमंत्री, ग्राम विकास | सदस्य |
| ७) प्रधान सचिव, ग्राम विकास | सदस्य सचिव |

या समितीची वर्षातून किमान एक बैठक हाईल. आवश्यकतेनुसार अन्य मंत्र्यांना समितीच्या बैठकीसाठी बोलविण्यात येईल.

### (ब) कार्यकारी समिती (Executive Committee)

| | |
|---|---|
| १) प्रधान सचिव, ग्राम विकास | अध्यक्ष |
| २) प्रधान सचिव, गृहनिर्माण | सदस्य |
| ३) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| ४) प्रधान सचिव,सामाजिक न्याय विभाग | सदस्य |
| ५) उप सचिव (योजना), ग्राम विकास विभाग | सदस्य |
| ६) मुख्य कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान | सदस्य |
| ७) राज्यस्तरीय बँकर्स समिती (SLBC) (प्रतिनिधी) | सदस्य |
| ८) राज्य संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण | सदस्य सचिव |

या समितीची तीन महिन्यातून एकदा किंवा आवश्यकता असेल तेव्हा बैठका आयोजित केल्या जातील. कक्षाच्या कामकाजासंदर्भात सर्व निर्णय घ्यावयाच्या शक्ती कार्यकारी समितीला देण्यात येत आहेत. तथापि, विशेष निदेशाद्वारे दैनंदिन कामकाजाच्या संदर्भात, राज्य व्यवस्थापन कक्ष (इंदिरा आवास योजना) यांना प्राधिकृत करण्यात येईल.

*-*-*-*-*-*